सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...



### धाग्यांच्या कलेतून साकारला भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभम यन्नम या कलाकाराने धाग्यांच्या कलेतून (Thread Art / String Art) साकारलेला भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा पालकमंत्री जयकुमार गोरे यांना सुपुर्द करण्यात आला. केवळ धाग्यांचा वापर करुन तयार केलेली ही कलाकृती संयम, मेहनत, देशप्रेमाचे प्रतीक असल्याचे सांगण्यात आले. प्रजासत्ताक दिन हा स्वातंत्र्य, एकता आणि लोकशाही मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. ही कलाकृती संविधान, राष्ट्र आणि प्रत्येक भारतीयाच्या हृदयाला अर्पण केलेली एक नम्र मानवंदना आहे. कलात्मक माध्यमातून देशभक्ती व्यक्त करण्याचा हा एक अनोखा प्रयत्न असून, तिरंग्याच्या माध्यमातून भारताची एकजूट आणि गौरव अधोरेखित होतो.

### मोबाईल टॉवरचे कार्ड चोरणारे पोलिसांच्या ताब्यात

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

मोबाईल टॉवरचे कार्ड चोरणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. शरद रामकृष्ण थोरात (वय-२९, रा. ढाळेफळ, जि.बीड), रवी रतनसिंग शिवसिंगवाले (वय-३९, रा.कुमठा नाका, सोलापूर) मेहबूब अजित कुरेशी (वय-३३, रा.सोलापूर) असे त्यांची नावे आहेत. जिल्ह्यात मोबाईल टॉवर कार्ड, केबल, बॅटरी चोरी झाल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांच्या पथकाने तपास करुन मोहोळ स्टँडजवळ आरोपींना पकडले.

### आईने रागावल्याने प्राशन केला पिवळा रंग

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

घरातील कामावरुन रविवारी सकाळी मुलीवर आई रागावली, त्या रागातून मुलगी भावना उसाकोयल (वय-१८, रा.नीलम नगर, सोलापूर) हिने अंगणात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. त्यात तिला त्रास होऊ लागला, तिच्या मामाने तिला तातडीने छत्रपती शिवाजी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.

# राज्यघटना ही भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ : पालकमंत्री

ना.जयकुमार गोरे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण









**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

दीर्घकालीन संघर्षानंतर देश स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाला एक सुसंघटित, लोकशाहीवादी आणि न्याय्य व्यवस्था देणे ही मोठी जबाबदारी होती. यासाठी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली. २६ जानेवारी १९५० रोजी ती अंमलात आणण्यात आली. ही राज्यघटना भारतीय लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री गोरे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिस मुख्यालय येथे आयोजित केलेल्या मुख्य शासकीय ध्वजारोहणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे, पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशक दीपाली काळे, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील आदी उपस्थित होते. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित संविधान आहे. असे सांगून पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले, घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुमोल योगदान दिले. संविधानाने आपल्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा वारसा दिला. प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, धर्म स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शिक्षणाचा हक्क दिला. त्यामुळे भारतातील लोकशाही ही जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही म्हणून ओळखली जाते.

यावेळी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. तंबाखू मुक्ती, कुष्ठरोग मुक्ती, बालविवाह प्रतिबंधबाबत शपथ देण्यात आली. तत्पूर्वी पालकमंत्री गोरे यांनी परेड कमांडर प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांच्या समवेत परेड निरीक्षण केले. परेड पथ संचलनात पोलीस विभाग, शहर पोलीस विभाग महिला व पुरुष पथक, राज्य राखीव पोलीस दल महिला व पुरुष, शहर पोलीस दलाच्या शीघ्र प्रतिसाद दल, होमगार्ड पथक, एनसीसी पथक बॉम्बशोधक पथक, श्वान पथक, आपत्ती व्यवस्थापन बचाव दल पथक आदींचा समावेश होता.

**यांचा झाला सन्मान**

एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद रोहिदास वाघमारे, शहर वाहतूक शाखा दक्षिणचे पोलिस उपनिरीक्षक राजकुमार तोळनुरे (पोलिस दलात उत्कृष्ट कार्य व सेवा बजावल्याबद्दल राष्ट्रपती पदक प्राप्त), अश्विनी दिलीप गाजरे, प्रसाद छगन मांढरे, शिवानंद सौदागरे, दत्तात्रय शंकर बोरिगिड्डे, नागेश राजाराम बनकर, नारायण विनायकराव पवार, नागनाथ जयराम खुणे (सोलापूर ग्रामीण अंतर्गत अधिकारी कर्मचारी)

# सोलापूर-तिरुपती हवाईसेवा लवकरच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**




विमानसेवा आणि प्रस्तावित आयटी पार्कमुळे सोलापूर शहर-जिल्ह्याच्या विकासात मोठी भर पडत आहे. गोवा, मुंबई, इंदौरनंतर लवकरच तिरुपतीसाठी हवाई सेवा सुरु करण्यात येणार आहे, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

प्रजासत्ताकदिनी माध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, सोलापूर शहरातील जनतेने आम्हाला भरभरुन मतदान केले आहे; यामुळेच १०२ पैकी तब्बल ८७ जागांचे आम्हाला बहुमत मिळाले आहे. यामुळे आता जनतेची सेवा आम्ही ५ वर्षे करीत राहणार आहोत.

शासन आणि पोलिस प्रशासनाच्या वतीने शहरातील अवैध धंद्यांनाही हद्दपार करणार आहोत; त्याच धर्तीवर नुकतीच अवैध दारु धंद्यांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. वाळू तस्करांवरही कारवाई करण्यात आली होती.

भविष्यातही शहर-जिल्ह्यातील अवैध उद्योगांना आळा घातला जाईल, असेही पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.सुषमा अंधारे यांनी केलेल्या टीकेविषयी विचारले असता ते म्हणाले, लोकशाही तत्वाप्रमाणे आम्ही निवडणूक जिंकली आहे.

जनतेने भाजपाला दिलेल्या जनाधाराचा प्रा.अंधारे यांनी आदर करावा, विनाकारण प्रत्येक गोष्टीत राजकारण करू नये.



# दररोज पाणी देण्यासाठी जलवितरण व्यवस्था विस्तारीकरणाचे प्रयत्न

## महानगरपालिकेत आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

२०६० पर्यंतच्या गरजांचा विचार करुन शहरातील सर्व नागरिकांना दररोज पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी जलवितरण व्यवस्थेचे विस्तारीकरण आणि बळकटीकरण करण्यासाठी ठोस प्रयत्न सुरु आहेत. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनी एकत्रित प्रयत्न केल्यास सोलापूर हे स्वच्छ, सुरक्षित, सक्षम आणि आदर्श शहर बनेल, असा विश्वास आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केला. भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्या वतीने इंद्रभुवन परिसरात आयोजित केलेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते.

संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर तंबाखूमुक्ती, कुष्ठरोग जनजागृती आणि बालविवाह प्रतिबंधक शपथ घेण्यात आली. अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे यांनी या कार्यक्रमाचे संचलन केले


यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखापरीक्षक सदानंद वाघमोडे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर, नगरसेवक अमोल शिंदे, आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने, नगर अभियंता सारिका आकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, मुख्य अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, नियंत्रण अधिकारी तपन डंके, सामान्य प्रशासन विभागाचे रजाक पेंढारी, युवराज गाडेकर, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी, महादेव इंगळे, यांच्यासह विविध विभाग अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स रिफॉर्म्स कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल संगणक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. दरम्यान, वारसा हक्क आणि अनुकंपा याच्या माध्यमातून मागील वर्षभरात १५० हून अधिक कर्मचाऱ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागात ५५ कर्मचाऱ्यांना मुकादम पदावर पदोन्नती आणि ३३० कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. सूत्रसंचालन नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी केले. याप्रसंगी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार आदी उपस्थित होते.

| आयुक्तांच्या भाषणातील ठळक मुद्दे |
|---|
| २०६० पर्यंत दररोज पाणीपुरवठ्यासाठी ८९२ कोटींची जागतिक बँक सहाय्यित जलपुरवठा योजना. |
| उजनीसोलापूर समांतर जलवाहिनी प्रकल्पामुळे प्रायोगिक पाणीपुरवठा सुरु. |
| ९८ कोटींचा स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्प प्रगतीपथावर. |
| ४२९ कोटींची भुयारी गटार योजना व ४९ एमएलडी क्षमतेचे सांडपाणी शुध्दीकरण केंद्र. |
| सर्व महापालिका सेवा ऑनलाईन; नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार. |
| यापूर्वी अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नती, वेतनवाढ, ४ टक्के महागाई भत्ता लागू. |

# श्री वीरतपस्वी पुण्यतिथी; आजपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**






श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ७० व्या पुण्यतिथीनिमित्त श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने काशी पीठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सानिध्यात व श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे अध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

बुधवार, २८ जानेवारी रोजी सकाळी ९.०० वाजता अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी शिक्षण संकुल येथे रक्तदान शिबीर. शुक्रवार, ३० जानेवारी रोजी अक्कलकोट रोड येथील एसव्हीसीएस डी. एड. कॉलेज येथे वक्तृत्व, श्लोक पाठांतर, रांगोळी स्पर्धा. शनिवार, ३१ जानेवारी रोजी चित्रकला स्पर्धा. १ फेब्रुवारी रोजी श्री भगवती गौरीमाता प्रशाला धोत्री येथे चतुर्थी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या वतीने सकाळी ९.०० वा. आरोग्य शिबीर. शुक्रवार, ६ फेब्रुवारी रोजी पहाटे२.१० वा. उत्तर कसब्यातील होटगी मठात व मौजे होटगी येथील मठात शिवाचार्यांच्या हस्ते आत्मज्योत प्रज्वलित करण्यात येणार आहे. पहाटे ५.०० वा. श्री चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी हे आत्मज्योत शिरावर घेऊन हजारो भक्तगणांच्या समवेत उत्तर कसब्यातील होटगी मठातून होटगीकडे सवाद्य मिरवणुकीने मार्गस्थ होणार आहेत.

बाळीवेस येथील मठात गुरुवार, दि.५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.०० वा. श्री गुरु गादीस संगीत महारुद्र पूजा, सहस्त्रबिलवार्चन, सायंकाळी ६.०० मंगेश चिवटे यांच्या हस्ते बक्षीस वितरण, रात्री ८.०० वा.गीतसंध्या, १०.०० वा. भजन व कीर्तन. गुरुवार, दि.५ फेब्रुवारीपर्यंत बाळीवेस व होटगी येथे दुपारी ३ ते ५ यावेळेत श्रीसिध्दांत शिखामणी पारायण, सायंकाळी ५ ते ६ या वेळेत बाळीवेस मठात भजन, भारुड व कीर्तन.होटगी येथील बृहन्मठात बुधवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी प्राईम केअर हॉस्पिटल व रेणुकाचार्य क्लिनिक यांच्या सौजन्याने डॉ.आप्पासाहेब उमदी यांच्या दवाखान्यात डॉ.राहुल कारीमुंगी यांच्या प्रमुख उपस्थितीत आरोग्य तपासणी शिबिर, होटगी भक्तगणांच्या वतीने सकाळी ९.००वा. रक्तदान शिबिर व सोमवार, दि.२६ फेब्रुवारी ते गुरुवार ५ फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी ७.०० वा. महालिंगया शास्त्री-हिरेमठ यांचे प्रवचन होणार आहे. शुक्रवार, ६ फेब्रुवारी सकाळी ११.०० वा. आत्मज्योतीचे होटगी ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येणार आहे. सायंकाळी रथोत्सव कार्यक्रम होणार आहे. शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी दु. ४.०० वा. नंदीध्वज व पालखी उत्सव, सायं.७.०० वा. पाळणा, रात्री ८.००वा.शोभेचे दारुकाम होणार आहे

बुधवार दि ४ फेब्रुवारी रोजी सायं. ६.३० वा. श्री चक्रवर्ती सुलेबली यांचे 'स्वामी विवेकानंद एक विचार प्रवाह' या विषयावर व्याख्यान. ३१ जानेवारी ते सोमवार २ फेब्रुवारी असे ३ दिवस सायंकाळी ५.०० ते रात्री १०.०० पर्यंत अक्कलकोट रोडवरील वीरतपस्वी शिक्षण संकुलाच्या भव्य प्रांगणात विद्यार्थ्यांचा विविध कला गुणदर्शन कार्यक्रम, 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत आनंदमेळाचे आयोजन करण्यात आलेले असून या आनंदमेळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आलेले आहे.




### देशभक्तीचा जागर : ५ हजार विद्यार्थ्यांची संगीतमय कवायत

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा मुख्यालय स्तरावर ५ हजार विद्यार्थ्यांच्या सहभागातून देशभक्तीपर गीतांवर आधारित भव्य संगीतमय कवायत हरिभाई देवकरण प्रशाला मैदानावर शिस्तबध्दरित्या पार पडले. विद्यार्थ्यांनी एकसुरात सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांवर आधारित कवायतीतून राष्ट्रभक्तीचा जागर झाला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सांघिक भावना व राष्ट्रप्रेम रुजविण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, शिक्षणाधिकारीद्वय सचिन जगताप, कादर शेख, सुलभा वठारे, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, प्रा. शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने उपस्थित होते.

# बँका बंद असल्याने ग्राहकांचे हाल; एटीएममध्ये झाली फुल्ल गर्दी

- जनतेला भासला पैशांचा तुटवडा?
- बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**




प्रजासत्ताक दिनाची सार्वजनिक सुटी आणि मंगळवारी ऑल इंडिया एम्प्लॉईज युनियनच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलन यामुळे बँका बंद आहेत. चौथा शनिवार, रविवार, सोमवार (प्रजासत्ताक दिन), मंगळवार (बँक कर्मचाऱ्यांचा संप) असा सलग सुट्ट्यांमुळे ग्राहकांचे हाल झाले होते. पैसे काढण्यासाठी 'एटीएम'मध्ये मोठी गर्दी झाली होती.

बँक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात युनायटेड फोरम बँक युनियनच्या वतीने बँकांसमोर निदर्शने करण्यात आली. यात सोलापूर जिल्ह्यातील सुमारे तीन हजार बँक कर्मचारी सामील झाले होते. जुळे सोलापुरातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखे समोर घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. सुहास मार्डीकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, सन २०१५ पासून युनियनच्या या मागणीला सरकार प्रतिसाद देईनासे झाले आहे. सरकारद्वारे डिजिटल बँकिंग ऑनलाइन बँकिंग व मोबाईल बँकिंग इत्यादी सारख्या डिजिटल व्यवहाराचा प्रचार केला जातो असे असताना सुद्धा बाराव्या द्विपक्षीय करारानुसार आयबीएने मान्यता देऊन सुद्धा सरकार त्याबद्दल सकारात्मक विचार करत नाही. बँकांमध्ये सध्या प्रचंड प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. अशातच बँक कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर प्रचंड प्रमाणावर कामाचा ताण पडतो आहे; या सगळ्यांचा विचार करून बँकांना पाच दिवसाचा आठवडा त्वरित लागू करावा अशी संघटनेची मागणी आहे, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी सिध्दप्पा बिडवे, सचिन संकद, धनंजय होनमाने, अतुल कुलकर्णी, हारुन सय्यद, अविनाश गुरव, अमोल सांगळे, सुधीर गोसावी, ऑबरी अल्मेडा, विलास कोले यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान, नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, यूपीआय, एटीएम व इतर ऑनलाईन सेवा सुरु राहणार असल्याचे बँक प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले होते.

**या आहेत मागण्या...**

**पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, राष्ट्रीयीकृत बँकांमधून मोठ्या प्रमाणावर कर्मचारी सेवानिवृत्त होत असतानाही नवीन भरती न झाल्याने उर्वरित कर्मचाऱ्यांवर वाढलेला कामाचा ताण कमी करावा, तसेच ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी पुरेशा कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३३९

**भाव धरी तया तारील पाषाण ।**
**दुर्जना सज्जन काय करी ।।**

-भाव हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ होय. ज्याला हा आधारस्तंभ चांगल्याप्रमारे जोपासता येतो त्याला मानवी जीवन उत्कृष्टप्रकारे जगता येते असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. ढोबळमानाने भाव म्हणजे किंमत होय. दुसऱ्या शब्दात भाव म्हणजे श्रध्दा, भक्ती, आवड, आपुलकी आदि होय. निसर्गत: थोड्याफार प्रमाणत का होईना प्रत्येकाकडे कांही भाव हा असतोच. या भावनेची जोपासणूक कशी आणि किती करायची हे ज्याचे त्याच्यावर अवलंबून असते. एखादे कार्य करावे म्हणून करणे आणि भावपूर्वक करणे यात फरक आहे. जबरदस्तीने किंवा इच्छा नसतांना केलेल्या कार्यापेक्षा भावपूर्वक केलेल्या कार्याची फलश्रृती निश्चितच चांगली असते. हे सत्य असले तरीही जास्तीत जास्त लोक एखादे कार्य करायचे म्हणून करतात किंवा इतरांना दाखविण्यासाठी करतात. सांसारीक जीवनातली कार्ये तर सोडाच पण बरेच लोक पूजा, पाठ, सत्कार्य या कार्यालाही भावाची जोड देत नाहीत. संत महात्म्यांच्या शब्दांची भावपूर्ण जोपासणूक करून वागले तर जीवनात अडचणीवर सहज मात करता येते. भावनेने चालत्या बोलत्या माणसावर तर सोडाच पण पाषाणाच्या मूर्तीवर शुध्द श्रध्दा ठेवली तरी ती मूर्तीही त्याला तारू शकते. जो माणसावर, स्वत:वर श्रध्दा ठेवीत नाही तो दुर्जन होय. अशा दुर्जनाला सज्जनही काय करणार ? असे सकारात्मक व प्रश्नात्मक बोलतांना तुकाराम म हाराज म्हणतात, भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ।।



सज्जनांच्या सहवासात गेल्याने दुर्जनातही परिवर्तन होते, हे सत्य आहे. पण आपल्यात परिवर्तन होऊच द्यायचे नाही, आपण म्हणतो तेच खरे आहे, अशी मनाशी खूणगाठ बांधून बसलेल्या भावहीन लोकांना सज्जनही कांही करू शकत नाहीत. ऐकून घेण्याची मानसिकताच नसेल तर सज्जनांनी अशा लोकांसाठी आपला अमूल्य वेळ खर्ची घालण्याचे कारण नाही. अशा मूठभर लोकांना सुधारण्यात वेळ घालवायचा म्हणजे दुसरीकडे हजारो लोकांकडे दुर्लक्ष करावे लागते. याचा अर्थ असा नाही की सज्जनांनी अशा खोडसाळ, जिद्दी, हेकेखोर दुर्जनांना सुधारण्याचा प्रयत्नच करू नये .देव मानणाऱ्यापैकी अनेकांची भावना, श्रध्दा ही पाषाणाच्या मूर्तीवर असते. यांची भावना मूर्तीवर नसावी असे निश्चितच नाही. पण या भक्तांनी अशीच श्रध्दा, भावना आपल्या कुटूंबातील सदस्यावर, आजुबाजूच्या शेजाऱ्यावर, अडीअडचणीत सापडलेल्या जीवावरही जोपासावी. एकीकडे सुनेचा, सवतीच्या मुलांचा छळ करायचा आणि देवघरातल्या पाषाण मुर्तीला श्रध्देने पुजायचे म्हणजे हे दुर्जनत्व होय. मंदिरात जाऊन मूर्तीवर तेल तूपाचा वर्षाव करणारे मूर्तीसमोर भरपूर फळे, पंचपक्वान्न ठेवणारे मंदिराच्या दारासमोर पोटासाठी हात पसरून बसलेल्यांकडे दुर्लक्ष करीत असतील तर यांच्या अशा वर्तनाला शुध्द श्रध्दा म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. २८ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ. शु. अष्टमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- कृत्तिका (०९.२६)**
**योग - ब्रम्हा (२३.५३)**
**करण - वणिज (२७.१६)**
**राहू काल : सोमवार :**
**स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष : जन्म : १८६५: लाला लजपत राय : भारतीय स्वातंत्र्यसैनिक,**
**१९७७: मिर्झा हमीदुल्ला बेग यांनी भारताचे १५ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.**
**१६४६: मराठी राज्याची राजमुद्रा वापरुन लिहीलेले शिवाजीराजांचे पहिले पत्र उपलब्ध.**
**निधन : १९९७: पांडुरंग सुखात्मे : आहारतज्ञ पद्म भूषण**



## व्हॅलेंटाईन स्कूल

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिनसाजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे भारतीय रेल्वेचे निवृत्त लोको पायलट नागेंद्र माणेकरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे व शाळेच्या मुख्याध्यापिका कल्याणी जी एच, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिरीषा भीमनाथ यांनी करुन दिला. यावेळी बालकलाकांनी देशभक्तीपर नृत्य सादर केले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचे चित्रकलेच्या ग्रेड परिक्षेत बालचित्र कलाकांराचे व राष्ट्रीय स्तरावरील व राज्य स्तरावरील खेळांडूचे, राष्ट्र भाषा विकास परिषद पूणे द्वारा आयोजित हिंदी परिक्षेतील विशेष श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे गौरव करण्यात आले. त्याचबरोबर आदर्श शाळा पुरस्काराने मुख्याध्यापिका यांचेही सत्कार करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आर एस एस शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त तिरंगा मॅरेथॉन स्पर्धेत ४५-५० विद्यार्थी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन निलम माने व माधुरी गाडवे तसेच आभार श्वेता बत्तुल यांने केले.

# शहर परिसरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

**देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. राजधानी दिल्लीतील 'कर्तव्य पथावर' राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर भारतीय लष्कराने आपले शौर्य आणि शिस्तबद्ध संचलन सादर केले. सोलापूर शहर परिसरातील विविध शाळा, महाविद्यालय, विविध संस्था, संघटनांतर्फे भारताचा ७७ व्या प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध शाळांमध्ये सामूहिक राष्ट्रगीत, झेंडा गीत, राज्यगीत तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत आणि ध्वजगीत गाऊन तिरंग्याला मानवंदना देण्यात आली.**



## श्राविका शिक्षण संकुल

भारतीय संविधान चिरायू होवो आणि भारत माता की जय अशा घोषणांच्या निनादात श्राविका शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर विशाल गोरे, कांचन आगावणे, करुणा कंचनकोटी व संस्थेचे विश्वस्त देवई शहा, दीप्ती शहा उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत आणि ध्वजगीत गाऊन तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. तसेच इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व नृत्य सादर केले. नंतर संगीत कवायत प्रकार देशभक्ती गीतावर सादर करण्यात आले. संस्थेतील हिरूबाई ग्रंथालयाच्या वतीने आदर्श वाचक व आदर्श वाचक वर्ग याचे पारितोषिक देण्यात आले. तसेच याप्रसंगी जैन शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन सुवर्णा कट्टीमनी व प्रगती गांधी यांनी केले. तर मुख्याध्यापिका राखी देशमाने प्रास्ताविक केले.आभार जयश्री दळवे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय तृप्ती शहा यांनी करून दिली. शेवटी शालेय पोषण आहार अंतर्गत लाडू वाटप करण्यात आले.



## नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रकाश अजेटराव तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड, पुतळाबाई कुंभार, धीरज कुंभार, लक्ष्मी कुंभार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजपूजन करून ध्वजरोहण करण्यात आले. मान्यवरांचे शाल बुके देऊन स्वागत सत्कार करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी संगीतवर सामूहिक कवायत सादरीकरण केले. प्रशालेतील गायत्री कुंभार, तमन्ना बागवान, सृष्टी कोळी, इरण्णा कुंभार या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. जान्हवी पवार हिने देशभक्तीपर गीत गायन केली तर इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह नृत्य सादरीकरण केले. सहशिक्षक बगले एस. एम. यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व आपल्या मनोगतात सांगितले. मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिले. सूत्रसंचालन ए.एस.माने तर आभार एस.एस. शिंदे यांनी मानले.



**सोलापूर : हिराचंद नेमचंद वाचनालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रा. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य नीला मोरे, ग्रंथपाल दत्ता मोरे कर्मचारी उपस्थित होते.**



## पु.अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी राष्ट्रीय ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळ्याला प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ अतुल लकडे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे उपस्थित होते.



## विचारक्रांती संस्था

सिद्धार्थ हौसिंग सोसायटी येथे विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर महिलांवर्गाकडून तिरंगा फडकवण्यात आला याप्रसंगी जयश्री जगधने, लक्ष्मी शिवशरण, सुवर्णा शिवशरण, पौर्णिमा गायकवाड, वंदना शिंदे, विचारक्रांतीचे संस्थापक सुरज जगधने, सचिव राहुल शिवशरण, खजिनदार नागसेन बंगाळे, मनीष शिवशरण, हरीश इंगळे, विजय कांबळे , शुभम गायकवाड, रोहित दावणे, साहिल गायकवाड उपस्थित होते.

## मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे महाविद्यालय

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय श्री सिद्राम प्पा हत्तुरे प्राथमिक शाळा श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते तर प्रमुख अतिथी माजी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे, मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सिध्दप्पा वरनाळ गुरुजी, उपक्रम प्रमुख धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे होते. अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते भारत माता व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजावतरण केले. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत, झेंडा गीत, राज्यगीत तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून सर्वांनी तंबाखूमुक्तीची व कॉपी मुक्तीची प्रतिज्ञा घेतली. स्काऊट गाईड व आर एस पी,कब-बुलबुलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संचालन केले.सर्व विद्यार्थ्यांचे सामुहिक कवायत घेण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष वरनाळ गुरुजी व प्रमुख अतिथी वैजिनाथ हत्तुरे यांचा सत्कार धरेप्पा हत्तुरे व रमेश दिंडोरे यांनी केला. अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते हस्ते प्रशालेतील विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्वरा तळवार, स्वराज ताकमोगे, स्नेहा केसकर,साक्षी बम्मणगे,अर्णव मोरे, अंश राठोड, आरोही बनसोडे, श्राविका केसकर, प्रणाली चव्हाण, श्रावणी गाडेकर, भाग्यश्री स्वामी या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यावेळी प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केला.





## यमाईदेवी आश्रम शाळा

यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका उत्तर सोलापूर येथे प्रजासत्ताक दिन वॉलचंद कॉलेजच्या अधिष्ठता प्रा. डॉ. निशा वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहन करुन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक ज्येष्ठ पत्रकार शंकर जाधव, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे मार्केटिंग मॅनेजर स्वप्नील लांबतुरे, प्रारंभ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आकाश जाधव, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक नानासाहेब लोखंडे ,महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता व्हनकोळे-जाधव, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदीप चव्हाण उपस्थित होते. क्रीडा स्पर्धेचे बक्षीस पारितोषिक वितरण व शाळेतील शिक्षक तानाजी तानगावडे यांच्याकडून इ १ ली ते इ ७ वी मधील एका विद्यार्थ्यास आदर्श विद्यार्थी पुरस्कार आणि उत्कृष्ट खेळाडू म्हणून दोन विशेष पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शंकर जाधव यांनी ही मुलांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक नानासाहेब लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी केले तर आभार तानाजी तानगावडे यांनी मानले.

## ग्रंथालय संघ, हुतात्मा सार्वजनिक वाचनालय

देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन सोलापूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा ग्रंथालय संघ आणि हुतात्मा सार्वजनिक वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. खतीब वकील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालयाचे संचालक तेजू चव्हाण, हुतात्मा सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाह ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, प्रा. प्रथमेश बनसोडे, ग्रंथपाल वृषाली हजारे तसेच सेवक गीतांजली गंभीरे उपस्थित होते. जिल्हा ग्रंथालय संघाचे पदाधिकारी, हुतात्मा वाचनालयाचे कार्यकर्ते, वाचक प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य असेच सुरू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.





## शिवराय-भिमराय सामाजिक संस्था

शिवराय-भिमराय सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही बुधवार पेठ परिसरात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रशिक सामाजिक संस्थेचे प्रमुख सल्लागार शिवम सोनकांबळे, शिवराय-भिमराय सामाजिक संस्थेचे संस्थापक विजय जाई सोनवणे, नागेश रणखांबे, प्रवीण सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# तिरंग्याच्या साक्षीने चेतविले देशभक्तीचे स्फुल्लिंग



तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. २७ जानेवारी-

**जिल्ह्यातील विविध शाळा, संस्था, महाविद्यालयात विविध विधायक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपर वातावरणात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध आणि लेझीमसह प्रभातफेरी काढण्यात आली.**



## न्यू.इंग्लिश स्कूल, करकंब

न्यू इंग्लिश स्कूल करकंब येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रशालेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे सुदर्शन वेळापूरकर व्हॉइस प्रेसिडेंट बजाज ऑटो पुणे यांच्या उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान प्रतीचे पूजन करून संविधान वाचन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांची भाषणे, नृत्याविष्कार, यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप, ऑपरेशन सिंदूर व योगावर आधारित विविध प्रकारचे कार्यक्रम, स्काऊट संचलन विद्यार्थ्यांनी सादर केले.



## जय मल्हार सार्वजनिक वाचनालय, जामगाव

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जामगाव येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जय मल्हार सार्वजनिक वाचनालय' येथे ध्वजारोहण सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून या महापुरुषांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असलेले ध्वजारोहण 'एकता मंच' च्या कोषाध्यक्ष रेश्मा मुकटे आणि आर्मी मेजर सदाशिव खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. तिरंगा फडकल्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत गाऊन सलामी दिली. याप्रसंगी एकता महिला मंचच्या सदस्या कल्पना वाघमोडे, सुचिता कुठे, माहेश्वरी गुरव, शुभांगी अडसूळ, रुक्मिणी पायघन, शामबाला सुतार, सोनल जाधव, सुनीता गात, जय वाघमोडे, अभिजित आवटे उपस्थित होते.



## जिजाऊ गुरुकुल, बार्शी

येथील जिजाऊ गुरुकुलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण जिजाऊ कॅडेट्सचा बेंजो ग्रुप आणि मार्च परेडमधील शिस्तबद्ध संचलन होते. कार्यक्रमाप्रसंगी विविध क्षेत्रांत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. रामचंद्र जगताप, डॉ. नवनाथ कसपटे यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे आणि संविधानाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम, फिजिकल कोच जे. बी. शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन मनसे मोठे व वैष्णवी क्षीरसागर यांनी केले तर आभार समृद्धी पवार यांनी मानले.



## ग्लोबल व्हिलेज स्कूल, सोलापूर

ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, सोलापूर ब्रँच येथे प्रजासत्ताक दिन संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विजयकुमार शिवकुमार बादोले (मुख्य गुप्तचर अधिकारी, महाराष्ट्र राज्य गुप्तचर विभाग) तसेच संस्थेच्या सचिवा संगीता शहा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विजयकुमार बादोले यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे महत्त्व, प्रामाणिकपणा, संविधानिक मूल्यांची जाणीव, कायद्याचा सन्मान, सामाजिक जबाबदारी तसेच राष्ट्रसेवेसाठी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. फ्यावेळी संस्थेच्या सचिवा संगीता शहा यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच सर्व कर्मचारीवर्ग यांनी परिश्रम घेतले.

## रेल्वे मैदान, पंढरपूर



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या प्रजासत्ताक दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले. रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात ३६ पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यींनी यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली. शासकीय ध्वजारोहण समारंभास आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणिती भालके, माजी आमदार प्रशांत परिचारक, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारीअमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे, डी.एस.आसवले, वैभव बुचके, आणीबाणीत करावास भोगलेले लक्ष्मीकांत गडम, अशोक क्षीरसागर, श्रीमती. रुक्मिणी पांडुरंग देशपांडे, सुभद्रा मेटकरी, भालचंद्र कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले.



## जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर, कुर्डूवाडी

जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. ध्वजारोहण मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी शिवदास आलाट (स्वच्छता निरीक्षक न.पा.कुर्डूवाडी), पालक प्रतिनिधी प्रशांत रणमोरे, प्रवीण लोकरे, भाग्यश्री पाटील, सुरेखा रणमोरे उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सर्वांग सुंदर कवायत प्रकार मार्च पास देशभक्तीपर गीत सादर केले. सूत्रसंचालन प्रदीप देशपांडे यांनी केले तर आभार किशोर मोहोळे यांनी मांडले. संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ सचिव अजित वायचळ यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. यावेळी सहशिक्षक किशोर मोहोळे, जयकुमार उपाध्ये, नवनाथ बुरकुले, आकाश घोडके, दिनेश आतकर, जयंत माळी, रवी शहा, गीतांजली शिंदे, साधना झोळ, निलोफर सय्यद, सुवर्णा साळुंखे, रूपाली गायकवाड उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास आकर्षक फुलांची सजावट

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात तिरंगा ध्वजाच्या रंगसंगतीत आकर्षक व नयनरम्य फुलांची सजावट करण्यात आली आहे, अशी माहिती प्र.व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्रींचा गाभारा, चौखांबी, सोळाखांबी तसेच श्री संत नामदेव पायरी या ठिकाणी



शेवंती, जरबेरा, झेंडू, गुलाब, ऑर्किड, ब्लू डेजी, कामिनी आदी सुमारे दोन टन फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. महत्त्वाचे सण-उत्सव व राष्ट्रीय महत्त्वाच्या विशेष दिनांच्या निमित्ताने मंदिरात नेहमीच देखणी फुलांची आरास करण्यात येते. फुलांची सजावट पुणे येथील विठ्ठल भक्त सचिन चव्हाण, इंद्रजीत दळवी व संदीप पोकळे यांनी सेवाभावी वृत्तीने मोफत स्वरूपात करून दिली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आलेली विद्युत रोषणाई व फुलांची सजावट पाहण्यासाठी दर्शन रांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.



## लोकविकास संस्था, वेळापूर

वेळापूर येथील लोकविकास मराठी मिडीयम स्कूल, इंग्लिश मिडीयम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष चंदनकर कोचिंग क्लासेसचे संस्थापक ॲड. प्रा.अमोल चंदनकर व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास सचिव चंद्रकांत नवले, भिमराव बनकर, सावता म्हेत्रे, तानाजी घाडगे, विठ्ठल म्हेत्रे, सचिन बनकर, रमेश बनकर, आनंद बनकर, सोमनाथ बनकर, रामचंद्र जंगले, प्राचार्य अमोल पांढरे, मुख्याध्यापक सुनिल पताळे, अजित बनकर उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल साठे यांनी केले तर आभार पूजा कुदळे यांनी मानले.

## ग्रामपंचायत कार्यालय, मोडनिंब

मोडनिंब (ता. माढा) येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सोसायटी, श्री उमा विद्यालय, संजीवन विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महामार्ग पोलिस दूरक्षेत्र, राज न्यू इंग्लिश स्कूल, संगनबसवेश्वर मठ, प्राथमिक आरोग्य केंद्र, मोडनिंब आउट पोस्ट आदी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील शाळा, महाविद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम, वक्तृत्व, स्नेहसंमेलन पार पडले. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांच्या नेत्रदीपक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. शफीक फाऊंडेशनच्या वतीने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून अंतराळ यान प्रतिकृती साकार करण्यात आले. फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. याबरोबरच शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २, उपळाई (ठो)

तालुक्यातील उपळाई (ठोंगे) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. २ येथे शाळेचे मुख्याध्यापक अनिल काळे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अंबरूषी लोकरे, भालचंद्र जामदार, निलेश वैद्य, साबीर शेख, दराडे भाऊसाहेब उपस्थित होते. यावेळी आरोही ठोगे, राजवीर खोडवे, सार्थक पाटील, कुलदीप वाघ, सुदीक्षा सातपुते, शरयू लोकरे, अमृता शिंदे, शिफा शेख, स्वरांजली काळे, स्वरांजली इतापे, अंकिता शिंदे, आरजू शेख, ईश्वरी भोरे, शंभूराजे गोरे, सना शेख, आरोही सदावर्ते, श्रेया रगडे, वैष्णवी माळी, वैष्णवी माळी वाघमारे, गौरी ठोगे, सार्थक शिंदे यांची भाषणे झाली. यानंतर मतदार जागृती अभियान अंतर्गत व किशोरी मेळाव्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ घेण्यात आला. यात चित्रकला, निबंध, रांगोळी, संगीत खुर्ची, लिंबू चमचा स्पर्धा तसेच विध्यार्थी व्यक्तिमत्व विकास अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धामधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन अनिल काळे व आनंद घाडगे यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक प्रभाकर काटे, रामचंद्र बरचे आनंद घाडगे, हरिभाऊ दळवी, श्रीमती बेबीनंदा खडबडे, वैशाली खुने, सुवर्णगौरी शिंदे, मिराबाई गरड, दिपाली गोरे उपस्थित होते.



## सहकार महर्षि साखर कारखाना, अकलूज

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज, जि.सोलापूर या कारखान्यामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन सोहळा कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते संपन्न झाला. यावेळी कारखान्याचे मा. संचालक, खातेप्रमुख व कामगार यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन राष्ट्रगीत व ध्वजगीताचे गायन केले. त्यानंतर कारखाना मुख्य कार्यालयासमोरील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे पुर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांचे शुभहस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. याप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, रामचंद्र सिद, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक जयवंत माने-देशमुख, माजी संचालक भिमराव काळे, मोहनराव लोंढे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडुरंग एकतपुरे तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, सेक्रेटरी अनिल काटे, चिफ् अकाउंटंट-युवराज इनामदार, मुख्य शेतकी अधिकारी रविराज उर्फ समाधान चव्हाण, चिफ इंजिनिअर सुर्यकांत गोडसे, को जन मॅनेजर युवराज निंबाळकर उपस्थित होते.



## कर्मयोगी इन्स्टिटयूट, पंढरपूर

येथील कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे महत्व विषद केले. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.गुरुराज कुलकर्णी, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य प्रा. एस एम जाधव, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्या प्रा. एम. आर. शिंदे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके उपस्थित होते.



## महात्मा फुले विद्यालय, मंद्रूप

महात्मा फुले विद्यालय येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक शिवपुत्र कोळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. जगताप उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीताचे गायन झाले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी दोरी मल्लखांब व लाकडी मल्लखांबाच्या माध्यमातून कसरतीचे प्रयोग सादर केले. या कसरतींसाठी पिरप्पा कमळे, प्रकाश पाटील व सिद्धराया कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. यावर्षीचा आदर्श विद्यार्थी म्हणून वेदांत विनायक देशपांडे, तर आदर्श विद्यार्थिनी म्हणून मुनीर अहमद शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष रवी केवटे उपस्थित होते. सूत्रसंचालन गावडे व तेली यांनी केले. राजू राठोड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.




## फिनिक्स पोदार लर्न स्कूल, बार्शी

येथील फिनिक्स पोदार लर्न स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा वैशाली कबाडे उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थितीत संस्थेचे सचिव संदीप बर्डे व मुख्याध्यापक रविराज बेलुरे होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापक रविराज बेलुरे यांनी विद्यार्थ्यांना चांगले नागरिक बनून संविधानाचा सन्मान राखण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने करण्यात आली.



## सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग

येथील सुवर्णलता गांधी महाविद्यालयात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष दिलीप शांतीलाल गांधी यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. ध्वजारोहणानंतर प्रा. रमेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली एन.सी.सी. कॅडेटनी शिस्तबद्ध आणि संचलन करत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. त्यांच्या या संचलनाने उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी अनुराधा मोलानी, राजश्री कांबळे व शंतनू पौळ या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमात संस्थेचे सचिव शितल गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. शकील शेख यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. सोहळ्यासाठी 'टाइम्स ऑफ इंडिया' ग्रुपचे किशोर पाटील, शर्मिला पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. खरटमोल एम. एन. यांनी केले तर आभार प्रा. जाधव बी. डी. यांनी मानले.

## जिल्हा परिषद शाळा, वेळापूर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर मुली शाळेचे ध्वजारोहण शाळेचे मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. प्रास्ताविक नितीन चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीणकुमार पांगे तर आभार प्रदर्शन जीवन रणनवरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी पांडुरंग कुलकर्णी, श्रीमती आसराबाई जैन, श्रीमती किरण घाडगे, सौ कविता आवटे आदींनी परिश्रम घेतले.



जिल्हा परिषद व पंचायत समितीची
# रणधुमाळी



# पंढरपूर : जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी रंगतदार तिरंगी लढत

## ८ गटांसाठी ४७ तर १६ गणांसाठी ७० उमेदवार निवडणूक रिंगणात

## गोपाळपूर गट बिनविरोध करण्यात नेत्यांना अपयश

## गोपाळपूर, कासेगाव, वाखरी, करकंब गटात महत्त्वपूर्ण लढती


**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अर्थात जिल्हा परिषदेच्या ८ गटांमध्ये ४७, तर पंचायत समितीच्या १६ गणांसाठी ७० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यंदा तिरंगी लढत होणार आहे. दरम्यान, गोपाळपूर जि.प.गट बिनविरोध करण्यासाठी भाजपाच्या बड्या नेत्यांनी प्रयत्न करुन देखील त्यांना यात अपयश आल्याचे दिसत आहे.

गोपाळपूर गटांमध्ये माजी जि.प.सदस्य गोपाळ अंकुशराव यांच्या पत्नी दुर्गाताई अंकुशराव या निवडणूक रिंगणात उतरल्या असून भाजपतर्फे त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. गेल्या वर्षी गोपाळपूर जिल्हा परिषद गट बिनविरोध झाला होता; यंदा मात्र मोठ्या नेत्यांनी अर्ज काढण्यासाठी दबाव आणल्याची चर्चा होती.

या दबावापोटी गोपाळपूर गटातून मातब्बर उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज काढून घेतले. मात्र या बड्या नेत्याचे निवडणूकीच्या रिंगणातील किरकोळ उमेदवारांकडे दुर्लक्ष केल्यामुळे या गटात पाच उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने सहाजिकच आता निवडणूक लागली.

विठ्ठल परिवारात फूट पडून पुरोगामी विचाराचे नेते भाजपमध्ये गेले आणि त्यांनी भाजपाकडून उमेदवारी मिळविल्या. दुसरीकडे पांडुरंग परिवाराच्या माध्यमातून परिचारक गट गेली २५-३० तीस वर्षे झाले या निवडणुकीत स्वत:चे वर्चस्व राखुन उभा आहे.



यंदाच्या या निवडणुकीत भाजप पक्षांच्या वरिष्ठांनी विशेष लक्ष घालून ही निवडणूक भाजपाच्या चिन्हावर लढविण्याचे ठरवून ग्रामीण भागात देखील कमळ फुलविण्याचे निश्चित केल्यामुळे येथील पांडुरंग परिवाराला दुय्यम स्थान मिळाले आहे. भाजपा विरोधात आमदार अभिजीत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व अजित पवार गट एकत्र करून निवडणूक लढत आहे. तर भगीरथ भालके यांनी तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून आपले उमेदवार उभे केले आहेत. तालुक्यातील करकंब, वाखरी, कासेगाव, गोपाळपूर आणि भोसे या महत्वपूर्ण लढती होत आहेत.

### ग्रामीण भागात कमळ फुलविण्याचा निर्धार

तालुक्यात परिचारकांच्या पांडुरंग परिवार गटाचे आत्तापर्यंत एकमुखी वर्चस्व असायचे. परंतु यंदा जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नुकत्याच राज्याभर झालेल्या नगरपालिका, महानगर पालिका निवडणूकीत शहरी भागात जसे कमळ फुलविण्यात भाजपाला यश आले त्याप्रमाणेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने ग्रामीण भागात कमळ फुलविण्याचा निर्धार करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### उमेदवारी अर्ज माघारी नंतरची स्थिती

पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ८ गटांमध्ये ६८ तर पंचायत समितीच्या १६ गणांमधुन १२४ अशा एकुण १९४ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे अंतिमरित्या जिल्हा परिषदेच्या आठ गटांतून ४६ उमेदवार तर पंचायत समितीच्या १६ गणांमधून ७० उमेदवार आता निवडणूकीच्या रिंगणात लढत आहेत.

# माळशिरस : जि.प.९ जागांसाठी ३० तर पं.स.च्या १८ जागांसाठी ५४ उमेदवार रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२७ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद गटातून ४७ अर्ज तर पंचायत समिती गणातून ६७ असे एकूण ११४ उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले. जिल्हा परिषदेसाठी ३० तर पंचायत समितीसाठी ५४ उमेदवार रिंगणात आहेत.

माजी सभापती वैष्णवी मोहिते-पाटील, विमल जानकर यांनी फोंडशिरस गटातून माघार घेतला. यशवंतनगर गणात अर्ज ठेवला आहे. छायादेवी नारनवर, तेजस्विनी घुले, विशाखा वाघमोडे यांनी संग्रामनगर गटातून माघार घेतला. जिल्हा परिषदसाठी संस्कृती सातपुते, जीवन जानकर, गौतम माने, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, रणजितसिंह जाधव तर पंचायत समितीसाठी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, यज्ञासेना जहागीरदार, आनंद शेंडगे, दत्तात्रय शेळके, देविदास वाघमोडे हे प्रमुख उमेदवार रिंगणात आहेत.



**दहिगाव जिल्हा परिषद गटात** ४ अर्ज शिल्लक तर ४ अर्ज माघार, गुरसाळे गण शिल्लक अर्ज ३ माघार ८, दहिगाव गण शिल्लक अर्ज ३ माघार २, मांडवे जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज २ माघार ८, मांडवे गण शिल्लक अर्ज २ माघार २,.

**कण्हेर गण** शिल्लक अर्ज ३ माघार २, फोंडशिरस जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज ३ माघार ७, भांबूर्डी गण शिल्लक अर्ज २ माघार २, फोंडशिरस गण शिल्लक अर्ज २ माघार ३, संग्रामनगर जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज २ माघार १०.

**मेडद गण** शिल्लक अर्ज ३ माघार ५, संग्रामनगर गण शिल्लक अर्ज २ माघार २,

**माळीनगर जिल्हा परिषद गट** शिल्लक अर्ज ४ माघार ६, माळीनगर गण शिल्लक अर्ज ३ माघार ३, लवंग गण शिल्लक अर्ज ३ माघार ४.

**बोरगाव जिल्हा परिषद गट** शिल्लक अर्ज ५ माघार ३, जांभूड गण शिल्लक अर्ज ३ माघार ५, बोरगाव गण शिल्लक अर्ज २ माघार ३, वेळापूर जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज २ माघार ३, वेळापूर गण शिल्लक अर्ज ६ माघार ४.

**यशवंतनगर गण** शिल्लक अर्ज ३ माघार ४, निमगाव जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज ४ माघार १, **निमगाव गण** शिल्लक अर्ज ४ माघार ३, गोरडवाडी गण शिल्लक अर्ज ४ माघार ८, पिलीव जिल्हा परिषद गट शिल्लक अर्ज ४ माघार ५, **पिलीव गण** शिल्लक अर्ज ३ माघार ६, तांदुळवाडी गण शिल्लक अर्ज ३ माघार १.

# पंढरपूर तालुक्यातील २ लाख ८५ हजार ८२७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क


## जि.प.च्या ८ गटांसाठी, पं.स.च्या १६ गणांसाठी होणार मतदान प्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ जानेवारी-**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी तालुक्यातील एक लाख ४८ हजार ९०२ पुरुष मतदार तर एक लाख ३६ हजार ९१९ स्त्री मतदार तसेच इतर ०५ अशा एकूण दोन लाख ८५ हजार ८२७ मतदारांचा समावेश असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे यांनी दिली.

जिल्हा परिषदेचा करकंब गटासाठी सर्वसाधारण आरक्षण असून ३६ हजार ७०८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये उंबरे गण (सर्वसाधारण) १७ हजार २२०, करकंब गण (सर्वसाधारण) १९ हजार ४८८ इतके मतदार आहेत.भोसे गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३२ हजार ५८५ मतदार आहेत. त्यामध्ये भोसे गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १८ हजार २३५, गुरसाळे गंण (सर्वसाधारण) १४ हजार ३५० असे मतदार आहेत.

रोपळे गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३८ हजार ६४८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये रोपळे गण(सर्वसाधारण महिला) १८ हजार ६३५ , सुस्ते गण (अनुसूचित जाती महिला) २० हजार १३ असे मतदार आहेत. गोपाळपूर गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३५ हजार १६४ मतदार आहेत. यामध्ये पुळूज गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १९ हजार ४३४, गोपाळपूर गणा (सर्वसाधारण महिला) १५ हजार ७३० मतदारांचा समावेश आहे.



वाखरी गट सर्वसाधारण महिला आरक्षित असून ३३ हजार ७४२ इतके मतदार आहेत. यामध्ये वाखरी गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग) १६ हजार ९६४, पटवर्धन कुरोली गण (सर्वसाधारण महिला) १६ हजार ७७८ इतके मतदार आहेत. भाळवणी गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३४ हजार ४८ इतके मतदार आहेत. यामध्ये भाळवणी गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग) १६ हजार ४०८, पळशी गण (अनुसूचित जाती महिला) १७ हजार ६४० इतके मतदार आहेत.

टाकळी गट अनुसूचित जाती आरक्षित आहे. या गटात ४० हजार ८८५ इतके मतदार आहेत. यामध्ये टाकळी गण (सर्वसाधारण) २० हजार २६५ , खर्डी गण(अनुसूचित जाती) २० हजार ६२० इतके मतदार आहेत. कासेगाव गट नागरीकांचा मागासवर्ग आरक्षित असून या गटात ३४ हजार ४७ इतके मतदार आहेत. यामध्ये कासेगाव गण (सर्वसाधारण) १७ हजार १५०, सरकोली (सर्वसाधारण महिला) १६ हजार ८९७ इतके मतदार आहेत.

# माढा : जि.प.च्या ७ जागांसाठी २० तर पं.स.च्या १४ जागांसाठी ५० उमेदवार रिंगणात

## काही ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत

## भुताष्टे गणातून भाजपच्या अधिकृत उमेदवारांची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२७ जानेवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद गटातून ५७ जणांनी तर पंचायत समितीच्या गणातून ११२ जणांनी उमेदवारी माघारी घेतली आहे. जिल्हा परिषदेच्या ७ गटांसाठी ७७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यातील ५७ जणांनी उमेदवारी माघारी घेतल्याने ७ जागांसाठी २९ उमेदवार रिंगणात आहेत. पंचायत समितीच्या १४ जागांसाठी १६९ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यातील ७ अर्ज नामंजूर करण्यात आले होते. १६२ पैकी ११२ जणांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याने ५० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान, काही ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत होणार आहे. भुताष्टे पंचायत समिती गणातून भाजपचे अधिकृत उमेदवार योगेश पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेऊन भाजप पुरस्कृत उमेदवाराला पाठिंबा दिला आहे.



तालुक्यातील जिल्हा परिषद गटनिहाय उमेदवार आणि पक्ष याप्रमाणे; मानेगाव गट-पृथ्वीराज सावंत (भाजपा), सुहास पाटील-जामगांवकर (राष्ट्रवादी), शिवाजी शिरसट (वंचित), क्रांतीकुमार पाटील (अपक्ष), विश्वजीत पाटील (अपक्ष). उपळाई बु गट-माधुरी मोरे (भाजपा), हर्षदा पाटील (राष्ट्रवादी श.प.), कालिंदा लवटे (रासप), मोडनिंब गट-वंदना कांबळे (भाजपा), प्रभावती शिंदे (एनसीपी), अश्विनी लोकरे (अपक्ष). टेंभूर्णी गट-अमृता वाघे (भाजपा), अंजनादेवी पाटील (राष्ट्रवादी श.प.). बेंबळे-रोहिणी ढवळे (भाजपा), सविता कोकाटे (शिवसेना). भोसरे गट-अश्विनी दळवे (एनसीपी), शर्मिला उबाळे (राष्ट्रवादी श.प.). कुर्डु गट-संभाजी ढाणे (एनसीपी), बाळासाहेब ढेकणे (राष्ट्रवादी श.प.), बाबुराव बनसोडे (वंचित).

पंचायत समिती गणातून निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार याप्रमाणे; मानेगांव-पंडित देशमुख (भाजपा), दादासाहेब पारडे (राष्ट्रवादी श.प.), दिलीप देशमुख (अपक्ष). दारफळ-मिराबाई ठोंबरे (भाजपा), जयश्री ठोंबरे (एनसीपी), सोनाली साठे (अपक्ष). उपळाई-नितीन झाडबुके (भाजपा), शशिकांत देशमुख (एनसीपी) भूताष्टे-स्वाती गिड्डे (भाजप पुरस्कृत अपक्ष), संतोष दळवी (राष्ट्रवादी श.प.), राजकुमार लोंढे (अपक्ष). मोडनिंब-प्राजक्ता पाटील (एनसीपी), मंदाकिनी वरवडे (भाजपा), मनिषा सुर्वे (उबाठा), लऊळ-सुनीता कोळी (उबाठा), सोनाली माळी (भाजपा), शितल भोंग (एनसीपी), प्रियंका नलवडे (अपक्ष), अभिलाषा वसेकर (अपक्ष), भोसरे-आशिष रजपूत (एनसीपी), राहुल आखाडे (राष्ट्रवादी श.प.), रविंद्र चांदणे (वंचित), सतीश चांदणे (अपक्ष), ज्योतीराम बोबडे (अपक्ष).

रोपळे-छायादेवी करंडे (एनसीपी), वैशाली गोडगे (शिवसेना). कुर्डु-आशा गायकवाड (उबाठा), अमृता पाटील (एनसीपी), भाग्यलक्ष्मी पाटील (अपक्ष). अकोले खु-आकाश पाटील (राष्ट्रवादी श.प.), संभाजी पाटील (एनसीपी), प्रविण वाघमारे (वंचित). पिंपळनेर-बिभीषण डांगे (भाजपा), संजय ढवळे (शिवसेना), शुभम फुगे (उबाठा), संघर्ष पांडगळे (वंचित), अजिनाथ जाधव (अपक्ष). बेंबळे-पोपट अनपट (राष्ट्रवादी श.प.), विष्णू हुंबे (भाजपा), परमेश्वर गायकवाड (अपक्ष). रांझणी-तेजस्विनी पवार (राष्ट्रवादी श.प.), सुनिता पाटील (भाजपा), स्मिता माने (उबाठा), अश्विनी झेंडे (वंचित), वैशाली कळसाईत (अपक्ष). टेंभुर्णी-प्रतिभा खरात (भाजपा), जयश्री लोंढे (एनसीपी), जयश्री सातपुते (शिवसेना), डिंपळ साळवे (काँग्रेस), पुनम नवगिरे (वंचित).

## दक्षिणमध्ये बहुरंगी लढत

## अनेक दिग्गजांची निवडणुकीतून माघार

# जि.पच्या ६ जागांसाठी २८ , पं.स.च्या १२ जागांसाठी ५२ उमेदवार रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

१६ जानेवारीपासून सुरु झालेली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीचे २७ जानेवारी रोजी अंतिम चित्र स्पष्ट झाले. शेवटच्या दिवशी अनेक दिग्गजांनी उमेदवारी अर्ज माघार घेतल्याने दक्षिण तालुक्यात बहुरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या ३८ तर पंचायत समितीच्या ७६ उमेदवारांनी अर्ज माघार घेतला. तर जिल्हा परिषदेच्या ६ जागांसाठी २८ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ५२ उमेदवारांमध्ये सामना रंगणार आहे. सोमवारी २७ जानेवारी उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने भाजपाचे पदाधिकारी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे अर्ज माघार घेण्यासाठी प्रयत्न करीत होते. उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी इंदुमती अलगोंडा, केदार विभुते, अप्पा धनके, अनिल ननवरे, सिध्दाराम हेले, वैभव हलसगे, रेखा बाराचारे, महेश बिराजदार,गंगाराम चौगुले, अश्विनी बर्वे, सविता मेंडगुदले,विद्युलता कोरे, शालन चव्हाण, शितल राठोड, शकुंतला शिळ्ळे, यशपाल वाडकर,इरेशा कटारे, शिवानंद आंदोडगी, योगीनाथ दिंडोरे, प्रशांत सलगरे, रविकांत पाटील, हर्षवर्धन देशमुख, शिवराज कालदे, मोतीराम चव्हाण, रेवणसिध्द मेंडगुदले,संतोष बरुरे,पिंकू नरूटे, सारीका पाटील, अभिलाषा कमळे, शैलजा जानकर यांनी उमेदवारी अर्ज माघार घेतला.



# चोपडी जि.प.गटात प्रत्येक गावचा विकास

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ जानेवारी-**

चोपडी जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावाचा विकास, प्रत्येक नागरिकाला न्याय हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम करणार असल्याचे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी केले.

कारंडेवाडी (बुद्धेहाळ), कारंडेवाडी (उदनवाडी), सोमेवाडी, निजामपूर, हणमंतगाव, लोणविरे, नाझरे या गावामध्ये प्रचार दौऱ्यादरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधताना ते बोलत होते. बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. पंतप्रधान आवास योजना व अन्य घरकुल योजनांच्या माध्यमातून प्रत्येक पात्र कुटुंबाला पक्के घर मिळवून देण्यासाठी कटिबध्द आहे, असेही त्यांनी सांगितले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक विशेष घडामोडी







पहिल्या छायाचित्रात उत्तर तहसील कार्यालयात जिल्हा परिषद गटात उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी सौ भडकुंबे समवेत काका साठे. दुसऱ्या छायाचित्रात दक्षिण तहसील कार्यालयात जिल्हा परिषद गटातून बोरामणी मतदार संघातील भाजपच्या हेले यांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगण्यात आले. त्याप्रसंगी टिपलेले छायाचित्र. तिसऱ्या छायाचित्रात होटगी पंचायत समिती अपक्ष उमेदवारांना अर्ज मागे घेण्या स फोनाफोनी सुरू होती दक्षिण सोलापूर तहसील कार्यालयात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)